गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ६८ वा ● गुरुवार २५ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 68 | Date : 25/07/2024 | blow Thursday | Page 4 Price 4

## श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार, अजित पवारांचा पक्ष
### प्रकाश आंबेडकरांची बोचरी टीका

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : मराठा आरक्षणाचा मुद्दा सध्या राज्यात चर्चेत आहे. मनोज जरांगेंनी आजच उपोषण सोडलं आहे, आपण आता विधानसभेची तयारी करणार असे संकेत जरांगेंनी दिले आहेत. तर दुसरीकडे लक्ष्मण हाकेंनी ओबीसी समाजासाठी आंदोलन सुरु केलं आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय नेत्यांच्या यात्रा लवकरच सुरु होणार आहेत. अशात प्रकाश आंबेडकर यांनी श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार, अजित पवारांचा पक्ष असं म्हटलं आहे.



महाराष्ट्रात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणावरुन हे दोन समाज आमने-सामने आले असून त्यावरून गावागावात आणि नेत्यांमध्येही जातीय तणाव पाहायला मिळत आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरुन समाजात जातीय संघर्ष वाढत असल्याने राज्यात सलोखा निर्माण व्हावा आणि आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी वंचित आरक्षण बचाव यात्रा काढली जात असल्याचं सांगण्यात येत आहे. त्याच पार्श्र्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली.महाराष्ट्रात ओबीसी आणि मराठा हे दोन समाज एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. मात्र, अशावेळेस राजकीय पक्ष आणि नेत्यांनी कोणतीही भूमिका घेतलेली नाही. हे पक्ष जातींचे पक्ष आहेत, श्रीमंत मराठे म्हणजे शरद पवार पक्ष,काँग्रेस आणि अजित पवार यांचा पक्ष असे आहेत. तर कायस्थ प्रभूंचे पक्ष म्हणजे भाजपा आणि शिवसेना उबाठा यांचा पक्ष आहे. यामुळेच आम्ही आता गुरुवारपासून आरक्षण बचाव यात्रा काढत आहोत. चैत्यभूमीवरुन ही यात्रा सुरु होईल, । पान २ वर

# पक्षपातावरून खडाजंगी; अर्थसंकल्पातील राज्यांच्या अनुल्लेखामुळे 'इंडिया' आघाडी आक्रमक




नवी दिल्ली : अर्थसंकल्पामध्ये बिहार आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांखेरीज अन्य कोणत्याही राज्याचा उल्लेख नसल्यावरून बुधवारी राज्यसभेमध्ये जोरदार खडाजंगी झाली. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावरून सरकार आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यावर टीकेची झोड उठविली. त्यावर राज्यांचा उल्लेख नाही, म्हणजे केंद्राने काही दिले नाही असा अर्थ होत नाही, असा पलटवार अर्थमंत्र्यांनी केला.

'अर्थसंकल्पात बिहार व आंध्र प्रदेश ही दोन राज्ये वगळता इतर कोणत्याही राज्यांना पुरेसा विकासनिधी दिला गेलेला नाही. अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सीतारामन यांनी फक्त दोन राज्यांचा उल्लेख केला, अन्य राज्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले,' असे आरोप काँग्रेस व 'इंडिया'च्या इतर घटक पक्षांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये तसेच संसदेच्या बाहेरही केले. २०२४-२५ चा अर्थसंकल्प म्हणजे 'खुर्ची वाचवा दस्तावेज' असल्याची टीका लोकसभेतील । पान २ वर

## पुणेकरांनो सावधान! आज जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट, गरज असेल तरच बाहेर पडा, प्रशासनाचं आवाहन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस (क्शर्रीं ठरळप) सुरु आहे. पावसामुळं अनेक भागात जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या पुण्यात पावसाची (झींपश ठरळप) तुफान बॅटिंग सुरु आहे. सिंहगड रोड परिसरातील अनेक घरात पाणी शिरलं आहे. दरम्यान, आज देखील पुणे जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. आज पुण्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट (जी-रपसश -श्रशीीं) जारी करण्यात आला आहे.

हवामान विभागान येत्या काही तासात पुणे शहर आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसर आणि पुणे शहरातील शाळा आणि महाविद्यालये आज (२५ जुलै) बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत. या मुसळधार पावसाच्या पार्श्र्वभूमीवर खडकवासला धरणातून ४० हजार क्यूसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरू होत आहे. तसेच पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळं नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी केले आहे. पुण्यात रात्रभर तुफान पाऊस (झींपश क्शर्रीं ठरळप) सुरु आहे. या पावसामुळं सगळीकडे पाणीच पाणी झालं आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं आहे.

पुणे जिल्ह्यातील मुळशी ताम्हणी घाट येथे मुसळधार पाऊस सुरु आहे. या पावसामुळं दरड कोसळलेली आहे. रस्ता बंद आहे. पोलीस अधिकारी स्टाफ, तहसीलदार, प्रांत अधिकारी यांनी घटनास्थळी भेट दिली असून दरड काढण्याचे काम सुरु आहे.

आज कोकणसह पश्र्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्र्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांना आज पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळं आज या भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच मुंबईला आज पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे. काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुंबईत पहाटेपासूनच पावसाची रिपरिप सुरु झाली आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना देखील ऑरेंज अलर्ट दिला आहे.

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान: काढणीपश्चात व्यवस्थापणासाठी अर्थसहाय योजना

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवर्गातील शेतक-यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम योजनेतर्गंत काढणीपश्र्चात व्यवस्थापणासाठी एकात्मिक पॅक हाऊस, कन्व्हेअर बेल्ट, संकलन व प्रतवारी केंद्र या घटकास अनुदान मंजुर झालेले असुन या योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत शेतक-यांनी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

लाभार्थी निवडीचे निकष :- शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी २५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, तसेच वैयक्तिक शेतकरी, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (ज्यामध्ये किमान १५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, शेतकरी गट यांचेसाठी अर्थसहाय्य हे बैंक कर्जाशी निगडीत बैंक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील. प्रकल्पाचे तांत्रिक निकषः- फळपिके, फुलपिके, भाजीपाला, औषधी व सुगंधी वनस्पती पिके यांच्या आवश्यकतेप्रमाणे किमान १६ मे. टन प्रती दिवस म्हणजेच २ मे. टन प्रती तास या क्षमतेच्या एकात्मिक पॅक हाऊसची उभारणी करणे बंधनकारक राहील. फळपिकांच्या व वनस्पतींच्या आवश्यकतेप्रमाणे स्वच्छता, प्रतवारी, उत्पादनाचे मुळ रुपात बदल न करता काढणीपश्र्चात प्रक्रिया पॅकिंग, सिलिंग यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री असणे आवश्यक । पान २ वर

## हळद उत्पादनाचे क्लस्टर करणार; हळद उत्पादनातून मराठवाडा, विदर्भात सुवर्णक्रांती : मुख्यमंत्री शिंदे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : देशातील पहिले हळद संशोधन केंद्र वसमत येथे होत आहे देश आणि जागतिक पातळीवरून हळदीला असलेली मागणी लक्षात घेऊन राज्यातील शेतकऱ्यांना हळद लागवडीसाठी प्रोत्साहीत करून त्याचे क्लस्टर करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. मराठवाडा, विदर्भ सारख्या दुष्काळग्रस्त भागात हळदीच्या उत्पादनाने सुवर्णक्रांती होईल, असा विश्र्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.



सह्याद्री अतिथीगृह येथे हळद संशोधन केंद्राबाबत आढावा बैठक झाली त्यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी पणन मंत्री अब्दुल सत्तार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष, माजी खासदार हेमंत पाटील, कृषी विभागाच्या सचिव व्ही. राधा, भाभा अनुसंशोधन केंद्राचे प्रदीप मुखर्जी, केंद्रीय स्पाईस बोर्डच्या महाराष्ट्र प्रमुख ममता रुपेलिया यावेळी उपस्थित होते.हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे एकीकृत हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्र तयार होत आहे. या केंद्रासाठी ८०० कोटी रुपयांचा निधी आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. तीन वर्षांमध्ये हा प्रकल्प तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. हळदीचा वापर दैनंदिन जीवनापासून ते औषध निर्मितीसाठी केला जातो. त्यामुळे हळदीला । पान २ वर

## अक्कलकोट एस.टी. स्टँड मध्ये घाणीचे साम्राज्य प्रवाशाचे आरोग्य धोक्यात

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट एस.टी. स्टँड मध्ये घाणीचे साम्राज्य झाल्याने रोगराई पसरण्याची शक्यता आहे. पावसाळ्याचे दिवस चालू असून अक्कलकोट बस स्थानक नवीन बांधकाम चालू आहे सध्या तात्पुरते शेड मारून त्याठिकाणी कामकाज चालू आहे परतू येथील डेपो मॅनेजर यांनी बसस्थानक मध्ये लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे सोयी सुविधा करण्यात आलेले नाही बस स्टॉप मध्ये मोठ्या प्रमाणात पाणी थांबले असून त्या ठिकाणी येणाऱ्या प्रवाशांना काटेवरचे कसरत करावे लागत आहे या ठिकाणी वृद्ध, मुले यांना जीव मुठीत धरून चालत जावे लागत आहे यामुळे जीवितास धोका पोहोचू शकतो तसेच स्थानकामध्ये वृद्धासाठी व मुलांना थांबण्यासाठी कुठल्याही प्रकारचे सुविधा त्या ठिकाणी देण्यात आलेले नाही व कुठल्याही प्रकारचे स्वच्छता या ठिकाणी ठेवण्यात आलेले नाही बस स्टॉपच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज झालेले असून यामुळे पावसाळ्यातील पाणी थांबून रोगराई निर्माण होण्याची दाट शक्यता आहे व त्या ठिकाणी तालुका व्यवस्थापक यांनी लक्ष करून साफसफाई स्वच्छता करून घेण्यात यावे अशी मागणी प्रवाशातून होत आहे




## खासदार प्रणिती शिंदे पुन्हा चर्चेत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी संसद अधिवेशनात मराठा समाज व धनगर समाज आरक्षणाचा आवाज उठवला यावेळी बोलताना म्हणाले की भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीयांना आरक्षण मिळवून दिले पण केंद्र सरकार खाजगीकरण करून आरक्षण संपवीत आहे त्यामुळे आरक्षण मिळावे यासाठी मराठा समाज व धनगर समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे त्यामुळे त्यांना वाढत आहे केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे म्हणून लवकरात लवकर मराठा समाज व धनगर समाजाला आरक्षण द्यावे त्याचप्रमाणे महिला आरक्षणाची लागू करावी अशी मागणी संसदच्या प्रहारच्या वेळी आहे तसेच विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी जात निहाय जनगणना करण्याची मागणी ही केली आहे तेही करावी



## कुणी सत्तेचा ताम्रपट घेऊन जन्मला नाही : माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे
### उपअभियंता उषा बिडला यांच्या विरोधात सीईओंकडे तक्रार.




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः सत्तेचा ताम्रपट घेऊन कोणी जन्मला नाही व जन्मणार नाही.परंतु प्रशासनातील अधिकारी हे जर लोकप्रतिनिधीचे ऐकून काम करत असतील तर ते जनतेच्या हितातले नसल्याची टीका माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी केली. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे आपल्या शिष्टमंडळासह बुधवारी दुपारी जिल्हा परिषदेत आले होते. यावेळी त्यांच्यासोबत दक्षिणचे सुरेश हसापुरे,माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील,काँग्रेस नेते अशपाक बळोरगी,पंडित सातपुते,नितीन ननावरे, । पान २ वर

**सरपंचांनी पत्र दिले असतानाही ठेकेदाराचे बिल दिले..!**

अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर ते गुरववाडी या रस्त्याच्या कामासंदर्भात गुरववाडीचे सरपंच लक्ष्मी पुजारी यांनी सदरचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असलेबाबत उपअभियंता उषा बिडला यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दिलेली होती.परंतु सदर तक्रारीची दखल न घेता संबंधित ठेकेदारांसोबत आर्थिक गैरव्यवहार करून सदर रस्त्याचे बिल अदा करण्यात आले आहे.तरी या सदर कामाची क्वालिटी कंट्रोलकडून चौकशी करण्यात यावी अशी मागणी म्हेत्रे यांच्या शिष्टमंडळाकडून मनीषा आव्हाळे यांच्याकडे करण्यात आली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### अर्थमंत्र्यांची योजना स्वागतार्ह

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी लोकसभेत मांडला. पूर्ण बहुमत नसल्याने नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांच्या कुबड्या घेऊन सत्तेवर आलेल्या सरकारचा अर्थसंकल्प वरकरणी सर्वसमावेशक वाटत असला तरी निराशाजनक आहे. या दोन्ही मित्रांना खूश करण्यासाठी अर्थमंत्र्यांनी बिहार व आंध्र प्रदेशवर ४० हजार कोटी रुपयांची खैरात केली आहे. एक प्रकारे मित्रांना दिलेली ही रिटर्न गिफ्टच आहे. सरकारला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता यावा आणि या दोन्ही मित्र पक्षांनी इंडिया आघाडीकडे जाण्याचे स्वप्नही पाहू नये, यासाठी अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी केलेली ही भरीव तरतूद आहे. बिहार आणि आंध्र प्रदेशवर कृपादृष्टी दाखविणाऱ्या अर्थमंत्र्यांना पश्चिम बंगालचा विसर पडला. तेथे विरोधी पक्षाचे सरकार असल्यामुळे अर्थमंत्र्यांनी पक्षपातीपणा दाखविला. गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारने देशातील तरुण वर्गाची निराशा केली. बेरोजगारांना सरकारी नोकऱ्या देऊ शकले नाहीत. गगनाला भिडलेली महागाई आटोक्यात आणण्यात मोदी सरकारला अपयश आले. त्याचा राग मतदारांनी लोकसभा निवडणुकीत भाजपवर काढला. तरीही लोकभावनेची कदर करून अर्थसंकल्पात महागाई कमी करण्यासंदर्भातल्या उपायांकडे अर्थमंत्र्यांनी सोयीस्करपणे दुर्लक्ष केल्याचे दिसते. जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी कमी करून महागाईने पिचलेल्या सामान्य जनतेला अर्थमंत्र्यांना दिलासा देता आला असता. परंतु, मोबाइल, चार्जर, लिथीयम, चामड्याच्या वस्तू, सोने-चांदीवरील कर कमी करून उच्चभ्रू लोकांच्या खिशावर पडणारा आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न केला. कृषी क्षेत्रावर देशाची अर्थव्यवस्था अवलंबून असताना शेतकरी, शेतमजूर तसेच कष्टकरी वर्गासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुदींचा उल्लेख दिसत नाही. कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करणाऱ्या अर्थमंत्र्यांनी खते आणि औषधांवरील जीएसटी कमी केला असता तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे सरकारचे धोरण प्रामाणिक आहे, असे समजले गेले असते. तरुण वर्गाची निराशा दूर करण्यासाठी अर्थमंत्र्यांनी एक पाऊल पुढे टाकून देशातल्या पाचशे प्रथितयश कंपन्यांमध्ये कौशल्य प्राप्त करण्याची संधी उपलब्ध केली. त्याबदल्यात त्यांना १५ हजार रुपये टप्प्याटप्प्याने देण्याची घोषणा केली. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी एक कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याची

पान १ वरुन

### कुणी सत्तेचा ताम्रपट घेऊन

विनीत पाटील,सोमनाथ चिकलंडे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. म्हेत्रे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांची भेट घेऊन निवेदन दिले.त्यांच्यापुढे अक्कलकोट व दक्षिण तालुक्याच्या उपअभियंता उषा बिडला यांच्या मनमानी कारभाराची तक्रार केली.सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कामासंदर्भात एनओसी दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले.कामाच्या संदर्भात लोकांकडून पैसे घेणे.विरोधात तक्रार करतो म्हणणाऱ्यास दमदाटी करणे.असे प्रकार बिडला या सतत करत असल्याची तक्रार म्हेत्रे यांच्या शिष्टमंडळाकडून सीईओ मनीषा आव्हाळे यांच्याकडे करण्यात आली आहे.याबाबतीत सखोल चौकशी करण्याचे आश्र्वासन आव्हाळे यांनी दिल्याचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी सांगितले.या प्रकरणाबाबत बिडला यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी पत्रकारांचा फोन उचलला नाही.

### एकात्मिक फलोत्पादन विकास..

आहे. कच्चा माल व तयार मालासाठी साठवणुक सुविधा, हाताळणीसाठी आवश्यक यंत्रणा, वॉशिंग युनिट, ट्रॉली, प्लॅस्टिक क्रेटस्, लिप्टर्स, पाण्याची सुविधा आदीबाबींचा समावेश राहील. द्राक्ष पिकांच्या एकात्मिक पॅक हाऊसला अपेडाचे मान्यता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. एकूण प्रकल्प खर्चापैकी कमीत कमी ६० टक्के म्हणजेच ३० लाख रुपये मशिनरीसाठी तर उर्वरित ४० टक्के म्हणजेच २० रुपये लाख (जास्तीत जास्त) रक्कम बांधकामासाठी अनुज्ञेय राहील.अर्थसहाय्याचे स्वरुप :- सर्वसाधारण क्षेत्रासाठी ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल १७.५० लाख रुपये आणि डोंगराळ व अधिसूचित क्षेत्रासाठी ग्राहय प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल २५.०० लाख रुपये अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील.

जिल्हयातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवर्गातील शेतक-यांनी या घटकाचा लाभ घेण्यासाठी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी संबंधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

## ज्येष्ठांचे जीवन सुखकर करणारी मुख्यमंत्री वयोश्री योजना

मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्याकरिता राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांकरिता 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.



सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २४ लाख असून त्यापैकी सद्यस्थितीत ६५ वर्षे व त्यावरील अंदाजे एकूण १ कोटी ५० लाख ज्येष्ठ नागरिक आहेत. आज मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

योजनेचे स्वरुप: ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत.

मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल. या योजनेकरिता राज्य शासनातर्फे १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसें राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष: ज्या नागरिकांची ३१ डिसेंबर २०२३ अखेर वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील. ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.

लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे. निवड किंवा निश्र्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असणार आहे.

अर्जदारांने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करावे.अर्जासोबत आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.

योजनेची अंमलबजावणी: लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.

तसेच लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

६५ वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी पोलीस ठाण्यासमोर, येरवडा पुणे-०६ (दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०६६११ (ईमेल-acswopune@gmail.com) या पत्त्यावर सादर करावा.

**– विशाल लोंढे सहायक आयुक्त,**
**समाज कल्याण, पुणे**
**संकलन :– जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

### हळद उत्पादनाचे क्लस्टर करणार

देश आणि जगभरातून मोठी मागणी आहे. या पिकास किड कमी प्रमाणात लागते पाण्याचा वापर कमी प्रमाणात होते. नैसर्गिक आपत्तीस तोंड देणारे हे नगदी पीक असून त्याच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. शासकीय अभिसरण योजनांचा लाभ या केंद्रास देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. वसमत हळदीला जीआय मानांकन मिळाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

या संशोधन केंद्रामध्ये शेतकऱ्यांना गुणवत्ता असलेले उती संवर्धीत (टिश्यू क्लचर) रोपांसाठी प्रयोगशाळा, हळद प्रक्रीया केंद्र, विकीरण केंद्र करण्यात येत आहे. देशभरात ५० लाख टन हळदीचा वापर होतो त्यापैकी निम्मी हळद महाराष्ट्रात उत्पादित होते. जागतिक दर्जाचा देशातील हा एकमेव प्रकल्प आहे. या माध्यमातून स्थानिक शेतकऱ्यांची हळद निर्यात केली जाईल, त्याचबरोबर बेरोजगारांना रोजगार मिळण्यास मोठी मदत होईल, असे हळद केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी प्रास्ताविकात सांगितले.

### श्रीमंत मराठे म्हणजे शरद ..

मग पुण्यात फुले वाडा, नंतर अनेक जिल्हे करत पुढे औरंगाबाद येथे ७ ऑगस्ट रोजी यात्रेची सांगता होईल, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.

महाराष्ट्रातला ओबीसी समाज हा सध्या घाबरला आहे. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे ओबीसी कार्यकर्त्यांवर हल्ला होत आहे. राज्यात अशा घटना घडू नयेत आणि शांतता प्रस्थापित व्हावी अशी आमची भूमिका आहे. मनोज जरांगे हे थेट आरक्षण द्या किंवा आरक्षण रद्द करा म्हणत आहेत. या परिस्थितीत ओबीसींना त्यांचं आरक्षण जाईल असं वाटतं आहे. असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

### पक्षपातावरून खडाजंगी;

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. अर्थसंकल्पामध्ये राज्या-राज्यांवर अन्याय झाल्याचा आरोप करत 'इंडिया'च्या सदस्यांनी बुधवारी संसदेच्या आवारात निदर्शने केली.

महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड, जम्मू-काश्मीर या राज्यांमध्ये पुढील तीन-चार महिन्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. तरीही या राज्यांकडे केंद्राने दुर्लक्ष केले आहे, असा मुद्दा उपस्थित करून विरोधकांनी केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, अर्थसंकल्पात दोन थाळ्या ठेवल्या गेल्या, एकामध्ये भजी, तर दुसऱ्यामध्ये जिलेबी ठेवली गेली. बाकी कुठल्या राज्यांना काहीही मिळाले नाही! राज्यसभेत विरोधी पक्षांनी सभात्याग करून अर्थसंकल्पाचा निषेध केला. सभात्यागामुळे संतप्त झालेल्या सीतारामन यांनी तितक्याच आक्रमकपणे विरोधकांना प्रत्युत्तर दिले. काँग्रेस सरकारांनीही अनेक अर्थसंकल्प सादर केले आहेत. त्यामध्ये त्यांनी किती राज्यांचा उल्लेख केला होता, असे आव्हान त्यांनी विरोधकांना दिले. प्रत्येक राज्याचा अर्थसंकल्पाच्या भाषणात उल्लेख करता येत नाही. मी फक्त बिहार व आंध्र प्रदेशचा उल्लेख केला म्हणून इतर राज्यांवर अन्याय केला असे नव्हे, असे सीतारामन म्हणाल्या. विरोधकांकडून लोकांची जाणीवपूर्वक दिशाभूल केली जात असल्याचा आरोपही सीतारामन यांनी राज्यसभेत केला.

## संत तुकाराम महाराज पादुकांची पूजन मंदिर समितीचे सदस्य संभाजी राजे शिंदे यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर येथील आषाढी वारी सोहळा यात्रेची सांगता झाल्यानंतर आषाढी शुद्ध रविवार दिनांक २१ ७ २०२४ रोजी पौर्णिमेच्या दिवशी श्री जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांची गोपाळ काल्या नंतर परतीचा प्रवासा अगोदर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या भेटीसाठी व तरी विठ्ठल मंदिरात आल्यानंतर संभाजी राजे शिंदे शिवसेना जिल्हाप्रमुख पंढरपूर विभाग सदस्य श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके. व्यवस्थापक बालाजी पुदलवाड या भेटीवेळी स्वतःचे पदाधिकारी व मंदिर समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते



## एमसीए प्रवेशासाठीच्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेस मुदतवाढ; फॉर्म भरण्याची मोफत सुविधा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एमसीए प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने मुदतवाढ देण्यात आली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.




बऱ्याच विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व प्रमाणपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने पदव्युत्तर पदवी असलेल्या एम.सी.ए.च्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला शासनाने मुदतवाढ दिली असून सुधारित वेळापत्रकानुसार आता शनिवार, दि.२७ जुलै २०२४ पर्यंत रजिस्ट्रेशन करता येणार आहे. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व निश्र्चिती (कन्फर्मेशन) करण्यासाठी रविवार, दि.२८ जुलै २०२४ (सायं.५.००) पर्यंत मुदत दिली आहे. प्रवेशोत्सुक विद्यार्थ्याने एमएएच- एमसीए सीईटी २०२४ ही अथवा तत्सम परीक्षा दिलेली असावी. स्वेरीच्या एम.सी.ए. विभागाचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे. गेल्यावर्षी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी नोकरीसाठी विविध पदांवर रुजू देखील झाले आहेत. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध आहे. या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहीतीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता प्रा. करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व एम.सी.ए.चे विभागप्रमुख प्रा. मनसब शेख (मोबा. नंबर- ९०२८९०७३६७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## टाकळीवाडी येथील श्री गणेश मंदिरा मध्ये शेडची आवश्यकता; नागरिकांचे हाल

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गणेश मंदिर येथे प्रत्येक संकष्टीला भक्त येत असतात. प्रत्येक संकष्टीला महाप्रसादाचे आयोजन केले जाते. मंदिरासमोर शेड नसल्याकारणाने ऊन, वारा,पाऊस, यांच्याशी सामना भक्त लोकांना करावा लागत आहे. भर पावसात महाप्रसाद घ्यावा लागत आहे. मंदिराभोवती तात्पुरती ताडपत्री बांधून नियोजन केले जात आहे. अनेक लहान बालके, स्त्रिया, यांचे हाल होत आहे. मंदिरासमोर पावसामुळे चिखल होत आहे. तरी निवारा शेड लवकरात लवकर व्हावे अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कै.भगवानरावजी घाटगे यांच्या जयंतीनिमित्त श्रावणबाळ आश्रमात फराळाचे वाटप



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पत्रकार नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी चे संस्थापक अध्यक्ष कै. भगवानरावजी घाटगे यांच्या जयंतीनिमित्त अकिवाट तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर येथे श्रावणबाळ वृद्धाश्रम येथे कै.भगवानरावजी घाटगे यांच्या २१, जुलैजयंतीनिमित्त आश्रमामधील ज्येष्ठ नागरिकांच्या साठी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी विजय डकरे, रामचंद्र नंदी कुरळे, अमोल पाटील, विनोद भीरडे, यांच्या शुभहस्ते फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सासणे यांनी स्वागत केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोलापूर जिल्हा महिला अध्यक्ष वर्षा शिंदे यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार जाहीर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:सोलापूर जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाच्या) अध्यक्ष वर्षाताई शिंदे यांना यंदाचा अविष्कार फाउंडेशन इंडिया कोल्हापूर या संस्थेच्या मार्फत देण्यात येणारा सन २०२४ चा राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे. पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथील सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष वर्षाने शिंदे यांना सन २०२४ चा राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार निवडीची घोषणा अविष्कार फाउंडेशन संस्थेची पुणे विभागीय महासचिव संजय घोडके यांनी एका पत्रकार द्वारे केली आहे त्यांचे मूळ गाव वाखरीतील जिजाऊंची लेक सदैव सामाजिक राजकीय कार्यरत क्रीडा कला असलेल्या वरच्या ताई शिंदे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडल्यानंतर त्यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाबरोबर जाणे पसंत केले त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वर्षा शिंदे यांची सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक कला क्रीडा व आरोग्य इत्यादी क्षेत्रात तसेच शालेय विद्यार्थी विद्यार्थ्यांना मोफत व यापुढे वाटप करणे गोरगरीब दिंडलितांना उपेक्षित समाजासाठी मदत केली



ग्रामीण भागात तळागाळापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे त्यांना सोलापूर ग्रामीण भागात त्यांची ओळख निर्माण झाली त्यानंतर वर्षा शिंदे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांच्या खांद्यावर महत्त्वाची जबाबदारी म्हणून सोलापूर जिल्हा महिला राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्षपद दिले प्रवास झालेल्या पंढरपुरात वीस लाखाच्या आसपास आषाढी एकादशी सोहळा वारकरी भाविक भक्तांना भरला होता या यात्रेत महिला जिल्हाध्यक्ष वर्षाराणी शिंदे स्वतः उपस्थित राहून प्रत्येक वारकऱ्यांना मोफत खिचडी वाटप आरोग्य पाणी इत्यादी बाबत चौकशी करून त्यांना सर्व सेवा सुविधा महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने देण्यात आल्या होत्या व या सर्व सामाजिक राजकीय घटनांची तपशीलवार माहिती घेऊन त्यांची उल्लेखनीय कामगिरी पाहून अविष्कार फाउंडेशन संस्थेच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय असा नामांकित समायला जाणारा राजमाता जिजाऊ पुरस्कार देण्यात आले संस्था सामाजिक शैक्षणिक कलाखेडा वैद्यकीय क्षेत्रात गेले १८ वर्षे काम करीत आहेत अशा ताई शिंदे यांना राजमाता जिजाऊ राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्याकडून व महिला भगिनींकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे

या संस्थेच्या वतीने प्रत्येक वर्षी पुणे येथे ज्ञानज्योती पुरस्कार यास अन्य पुरस्कार आणि व्याख्यान इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते हा पुरस्कार वितरण सन्मान सोहळा हा शनिवारी दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी अकरा वाजता पुणे येथील शिवसेना अण्णाभाऊ साठे स्मारक पुणे सातारा रोड पद्मावती रस्त्यावर विवेकानंद पुतळयाजवळ येथे सन्मान सोहळा आयोजित केला असल्याचे पुरस्कार निवड समितीचे सहसचिव संजय घोडके यांनी केले आहे

# जनता विद्यालय नांदुर्डी येथे गुरुपौर्णिमा साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाड/प्रतिनिधी :निफाड तालुक्यातील जनता विद्यालय नांदुर्डी येथे गुरुपौर्णिमा अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी मुख्याध्यापक डावरे डी ए व पर्यवेक्षक दाते आर पी व




सर्व शिक्षक यांनी सर्वप्रथम महर्षी व्यासमुनी व सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री पगारे आर व्ही यांनी केले प्रास्ताविकात गुरुपौर्णिमा साजरा करण्यामागचा हेतू व का साजरी करतात याबद्दल मार्गदर्शन केले यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उपस्थित सर्व शिक्षकांचा सन्मान करून गुरुपूजन केले यावेळी विदयालयाचे प्राचार्य डावरे डी ए कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विदयार्थ्यांनी भाषणात विद्यार्थी जीवनातील गुरूची महती सांगितली. शिक्षकांच्या वतीने डुकरे एन जी यांनी आषाढ महिन्यातील गुरू पौर्णिमेचा दिवस हिंदूधर्मीय वर्षातील सर्वोत्कृष्ट शुभ दिवस मानला जातो. गुरू हे एक दिव्य व्यक्तीमत्त्व आहे. यासंदर्भात माहिती दिली. प्राचार्य डावरे डी ए यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गुरू विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आभार मानण्यासाठी, मिळालेल्या ज्ञानाबद्दल गुरूजनांचे कौतुक मनापासून केले पाहिजेत. याबाबत मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

# गुरु पौर्णिमेच्या मंगल दिनी पुरंदर तालुका शिक्षक संघाचा स्तुत्य उपक्रम कानिफनाथ गडावर वृक्षारोपण व बिजारोपण सोहळा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुरंदर/प्रतिनिधी:श्री क्षेत्र कानिफनाथ गड महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान श्री सद्गुरु कानिफनाथ महाराजांची तपोभूमी या पवित्र ठिकाणी पुरंदर तालुका शिक्षक संघ व श्री नवनाथ देवस्थान ट्रस्ट पंच कमिटी यांच्या वतीने गुरुपौर्णिमेचे मंगल दिनी वृक्षारोपण व बीजे रोपण सोहळा श्री आर ए चंद्रशेखर साहेब (इंटेलेजियन ब्युरो- महासंचालक -गृह विभाग भारत सरकार) व श्री संभाजी झेंडे साहेब माजी सनदी अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा!!
मच्छिंद्र त्याचा मुख्य शिष्य!!

गुरु परंपरेचा महिमा असलेल्या या श्री क्षेत्र कानिफनाथ पवित्र गडावर गुरु पौर्णिमेच्या मंगल दिन पुरंदर तालुका शिक्षक संघाचे आदरणीय सर्व गुरुवर्य यांच्या उपस्थितीत सदर वृक्षारोपण व बीजरोपण या ठिकाणी करण्यात आले.

श्री संभाजी झेंडे साहेब माजी सनदी अधिकारी यांनी यावेळी सांगितले की हा डोंगर पूर्वी उजाड माळरान होते परंतु देवस्थान ट्रस्ट ग्रामस्थांच्या सहकार्याने तसेच इतर काही सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या संघटनेच्या वतीने व वन विभागाच्या वतीने या ठिकाणी वेळोवेळी वृक्षारोपण करून आज हा परिसर आपणास असा दिसतोय,वृक्षारोपण ही काळाची गरज आहे,



वृक्षारोपण करून त्याच्या संवर्धन करा पर्यावरण जगवा.!!

वृक्षाचे करा संवर्धन धरतीचे होईल नंदनवन!!

असे मार्गदर्शन पर विचार वेक्त केले.

श्री आर ए चंद्रशेखर साहेब इंटेलिजन्स ब्युरो महासंचालक गृह विभाग भारत सरकार यांचा नवनाथ देवस्थान ट्रस्ट वतीने व पुरंदर तालुका शिक्षक संघाच्या वतीने सन्मान करण्यात आला त्यांनी या वृक्षारोपण कार्यक्रमाचे कौतुक केले व आपण माझा येथे सन्मान केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी श्री योगेश नाना फडतरे माजी स्वीकृत सदस्य जि. प. श्री दीपक शेठ फडतरे( उपाध्यक्ष नवनाथ देवस्थान ट्रस्ट )श्री जयंत नाना फडतरे( सचिव) श्री प्रकाश भाऊ फडतरे( संचालक) श्री प्रकाश काशिनाथ फडतरे (संचालक) श्री सुरेश नाना फडतरे( संचालक )श्री सोनबा कानू फडतरे (संचालक) श्री मंगेश आनंदराव फडतरे(संचालक)श्री दीपक बबन फडतरे,

माजी उपसरपंच रामशेठ फडतरे,श्री धोंडीबा शेठ कटके,डॉ विनायक गायकवाड (कार्यकारी अध्यक्ष - पुरंदर तालुका पोलीस पाटील संघ )अनेक मान्यवर व भाविक ग्रामस्थ उपस्थित होते तसेच पुरंदर तालुका शिक्षक संघाचे श्री राजेंद्र जगताप( जिल्हाध्यक्ष केंद्रप्रमुख संघटना) राजेंद्र कुंजीर( शिक्षण विस्तार अधिकारी पुरंदर) श्री प्रताप मेमाने (शिक्षण विस्तार अधिकारी पुरंदर)माजी अध्यक्ष -गणेश लवांडे,संजय जगताप,संजय लवांडे,श्री दत्तात्रय फडतरे-( चेअरमन प्राथमिक शिक्षक पतसंस्था) सचिव -संतोष कुंजीर,संचालक -अनंत जाधव, शिक्षक नेते सोमनाथ गजरे, संजय शेंडकर,संभाजी सेंड कर, शरद कुंभार, रवी कुंजीर,सुनील कुंजीर,कोषाध्यक्ष-शिवदास धुमाळ,सौ योगिता फडतरे मॅडम,असे अनेक मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री तानाजी फडतरे -(अध्यक्ष पुरंदर तालुका प्राथमिक शिक्षक संघ),यांनी केले.

सूत्रसंचालन श्री ह भ प बाळासाहेब फडतरे सर यांनी केले, व शेवटी श्री भानुदास कुंभारकर सर( चिटणीस पुरंदर तालुका शिक्षक संघ) यांनी मानले.

# सौ.सुरेखा कल्याणशेट्टी हायस्कूल मध्ये शिक्षण सप्ताहास उत्तम प्रतिसाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयाच्या वतीने दि २२ जुलै २०२४ पासून शिक्षण सप्ताहास प्रारंभ झालेला आहे. पहिल्या दिवशी अध्ययन-अध्यापन साहित्य प्रदर्शन मांडण्यात आले होते. यास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनात इ.५ वी ते १० वी तील विद्यार्थी सहभागी होते.



दुसरा दिवस दि २३ रोजी विद्यार्थ्याना गणित सोप्या पध्दतीने समजावून सांगण्यासाठी काही क्लुप्त्या, कोडे, पोस्टर्स प्रदर्शन घेण्यात आले. शिवाय गणितीय खेळ, गणित तज्ञांच्या गोष्टी सांगितले गेले. यावेळी गणित तज्ञ व सेवानिवृत्त शिक्षक बसवराज बंडगर, रविकिरण दंतकाळे, शिवानंद पुजारी आदी शिक्षक उपस्थित होते.

शिक्षण सप्ताहाचा तिसरा क्रीडा दिवस होता. यादिवशी मुलाना खेळाविषयी आवड निर्माण होणेसाठी विविध खेळ, पोस्टर्स प्रदर्शन घेण्यात आले.

काही विद्यार्थी खेळाचे महत्त्व सांगितले. कबड्डी, लंगडी,फुगडी,लिगोरी याशिवाय सापशिडी, बुध्दीबळ,सोंगट्या,कोडे आदी खेळ घेण्यात आले. पोस्टर्स प्रदर्शन मध्ये क्रिकेट वीर सचिन तेंडुलकर, आंतरराष्ट्रीय धावपटू मिल्खा सिंग, बॉक्सिंगपटू मेरी कॉम, रायफल शूटर अभिनव बिंद्रा, लांबउडी-अंजू जॉर्ज या आंतरराष्ट्रीय खेळाडूंचे पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले.

या सर्व कार्यक्रमास संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप,प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेवानिवृत्त शिक्षक खंडेराव घाटगे, शिवानंद पुजारी आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.

# वक्तृत्व, नेतृत्व व कर्तृत्वाचा त्रिवेणी संगम म्हणजे कै.आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सर



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांचा ९ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ सन्माननिय श्री. सिद्धेश्र्वर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते कै. सरांच्या प्रतिमेचे पुजन करून आदरांजली वाहण्यात आली.यानंतर या स्मृतिदिनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.अशोक साखरे यांनी वक्तृत्व,नेतृत्व, कर्तृत्व,आणि दातृत्व या कै. सरांच्या अंगी असलेल्या चतुरस्त्र पैलूवर प्रकाश टाकला तर सौ. सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. चंद्रकांत व्हनमाने यांनी संस्थेच्या प्रारंभिक प्रतिकूल परिस्थिती आणि आजच्या परिस्थितीचा आढावा घेत विद्यार्थ्यांना उपलब्ध सर्व सोयीसुविधांचा लाभ घेत प्रगती करण्याचे आवाहन केले तर हन्नूर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री. बसवराज बंडगर यांनी कै.सरांच्या इतिहाससारखा विषय व सहज सोप्या पद्धतीने शिकवण्याची त्यांची हातोटी यावर आपले विचार व्यक्त केले.याप्रसंगी युवा नेते व उपसरपंच श्री.सागरदादा कल्याणशेट्टी,हन्नूर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार, सौ. सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.अशोक दंतकाळे, सेवानिवृत्त विज्ञान शिक्षक श्री. विश्र्वनाथ चव्हाण, डोंबरजवळग्याचे पालक श्री. बाबूराव गवळी , प्रशालेचे पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.अप्पासाहेब काळे,प्रा.रविंद्र कालीबत्ते,श्री. रमेश शिंदे, श्री.शशी अंकलगे ,श्री.धनंजय जोजन,जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुला देवी स्वामी,समस्त शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग सहाय्यिका सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांनी केले तर आभार सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.

# शरण पाटील मित्रमंडळाकडून गरीब विद्यार्थ्यांना शालेय स्कूल बॅगचे वाटप

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

उमरगाः प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही सामाजिक क्षेत्रात सातत्य ठेवून मुरूम शहरातील शरण पाटील मित्रमंडळाच्या पुढाकाराने बुधवारी (ता. २४) रोजी शालेय स्कूल बॅगचे वाटप प्रतिभा निकेतन विद्यालयात उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते गरीब होतकरू विद्यार्थ्यांना करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका महानंदा रोडगे होत्या. यावेळी माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत बेंडकाळे, सुजित शेळके, गौस शेख, राजू मुल्ला, उपमुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, संतोषकुमार सुर्यवंशी, परिवेक्षक विवेकानंद पडसाळगे, प्रशांत मुरूमकर आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शरण पाटील मित्रमंडळाचे आयोजक देवराज संगुळगे, शिवा दुर्गे, राजकुमार लामजने, मेघराज लादे, नदीम इनामदार, संतोष स्वामी, सलमान कागदी, किशोर व्हडले, सूरज राजपूत आदींनी पुढाकार घेतला.



# महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचा ठाणे जिल्ह्यात भव्य वृक्षारोपण सोहळा









**दैनिक यशसिध्दि न्यूज**

ठाणे/मिलिंद जाधव : ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात महाराष्ट्र राज्य शिक्षण सेना ठाणे यांच्याकडून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणा पंधरवड्याचे आयोजन दरवर्षी १३ जुलै ते २७ जुलै दरम्यान करण्यात येते. या अंतर्गत २१जुलै रोजी वृक्षारोपणाचा भव्य सोहळा शहापूर तालुक्यातील विविध गावांत साजरा करण्यात आला. यावेळी सुमारे २००० झाडांची वृक्ष लागवड करण्यात आली. शहापूर तालुक्यातील मौजे उंभरई, धसई व बामणे या गावांत वृक्ष लागवड व शाळकरी मुलांना एक मूल एक झाड असे वृक्ष वाटप करून वृक्षरोपण सोहळा अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या मध्ये शाळकरी मुलांसाठी झाड दत्तक योजना जाहीर करण्यात आली. याप्रसंगी शिक्षक आमदार व महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना प्रांताध्यक्ष ज. मो. अभ्यंकर यांनी शाळकरी मुले, ग्रामस्थ व महाराष्ट्र शिक्षक सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना उद्देशून वृक्ष रोपणाचे मानवी संस्कृतीच्या संवर्धनासाठी असलेले महत्त्व विशद केले. त्याचबरोबर प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शेकडो विद्यार्थ्यांशी वृक्षारोपण व त्याचे संवर्धन करण्याची गरज या विषयावर प्रश्नोत्तर सत्र व मार्गदर्शन करून वृक्ष लागवडीची गरज त्यांच्या बालमनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. मागील दोनशे वर्षात झालेल्या प्रचंड वृक्षतोडीमुळे जागतिक उष्मा वाढ व हवामान बदलाने मानवी जीवन व एकूणच निसर्ग यांच्यावर झालेला विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून त्यांना जास्तीत जास्त वृक्ष लागवडीबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाप्रसंगी राज्य समन्वयक नितीन चौधरी, कोकण विभागीय अध्यक्ष जगदीश भगत, कोकण कार्याध्यक्ष विलास अँग्रे, कोकण कायदेशीर सल्लागार व ठाणे अध्यक्ष डॉ.संतोष गायकवाड कमवि सरचिटणीस मुंबई विभाग मंगेश पाटील, वृक्षारोपण ठाणे जिल्हा समन्वयक सचिन जाधव, शुभांगी निचीते ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष,ठाणे जिल्हाध्यक्ष कुलदीप पाटील(माध्य)(शहरी), ठाणे जिल्हाध्यक्ष (माध्य)(शहरी) भगवान गावडे, ठाणे जिल्हाध्यक्ष (प्राथ) प्रमोद पाटोळे, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष (प्राथ) नवनाथ पवार, ठाणे जिल्हा संपर्कप्रमुख (माध्य) नरेंद्र शिंदे, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष (माध्य) तुकाराम खाटेघरे, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष (माध्य) प्रकाश फर्डे, भिवंडी तालुकाध्यक्ष (प्राथ) रविंद्र तरे, ठाणे जिल्हा सचिव (माध्य) दिलीप चौधरी, शहापूर तालुका अध्यक्ष (माध्य) धनाजी धसाडे, शहापूर तालुका सचिव (माध्य) महेंद्र गायकर इत्यादी शिक्षक सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शिवसैनिक तसेच धसई ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माथाडी कामगार जिल्हाध्यक्ष, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, बचत गट महिला प्रमुख, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

# मुंबईकरांसाठी खुशखबर, मुंबईला पाणीपुरवठा करणारे तानसा धरण भरले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे : शहापूर - मुंबईला पाणीपुरवठा करणारा धरणांचा तालुका अशी शहापूर तालुक्याची ओळख.. मुंबई ला पाणीपुरवठा करणारे तानसा, वैतरणा (मोडक सागर ), भातसा आदी मोठाली धरणे या शहापूर तालुक्यातील आहेत.. गेल्या ८-१० दिवसापासून च्या सतत पडणाऱ्या पावसाने धरण क्षेत्रातील पाणी साठा मात्र चांगलाच वाढला आहे.. अशातच आज तानसा धरण संध्याकाळी ४:१५ च्या सुमारास भरून वाहू लागले आहे.. तानसा धरण भरून वाहू लागल्या मुळे प्रशासनाकडून नदीपात्रातील पाण्यात न उतरण्याच्या सूचना देऊन सावधानतेचा इशारा तानसा नदी काठावरील गावांना देण्यात आला आहे. यामध्ये ठाणे जिल्ह्यातील १८ गावे व पालघर जिल्ह्यातील १५ गांवांना सावधानतेचा इशारा आहे.

शहापूर तालुक्यातील भावसे, मोहिली, वावेघर, अघई, टहारपूर, नेवरे, वेलवहाळ, डिंबा, खैरे ही गावे, तर भिवंडी तालुक्यातील बोरशेती, एकसाल, चिंचवली, कुंडे, रावडी, अकलोली, वज्रेश्र्वरी, महाळुंगे, गणेशपुरी आदी गावे तानसा नदी काठावर आहेत.पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील निभावली, मेट, गोराडे ही गावे. वसई तालुक्यातील खानिवडे, घाटेघर, शिरली, अदने, पारोळा, अंबोडे, बँकांचे, साईवान, काशीत-कोरगांव, कोपरगांव, हेडावडे आणि चिमणे आदी गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तानसा धरण भरण्याच्या बातमी मुळे मुंबई करांची पाण्याची चिंता मात्र मिटली आहे असंच म्हणावं लागेल.

# दतवाड ग्रामपंचायत कर्मचारी यांची कौतुकास्पद कामगिरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

टाकळीवाडी/प्रतिनिधी: दत्तवाड तालुका शिरोळ येथील ग्रामपंचायत पाणी पुरवठा नादुरुस्त होऊन बंद पडली होती. पाणीपुरवठा नसल्यामुळे गावातील नागरिककाचे पाणी विना हाल होत होते.दत्तवाड पंचायत चे कर्मचारी, श्री. नाना कासार, श्री. महातेश पटेकरी,यानी आपल्या जिवाची काळजी न करता, महापूर च्या एवढया मोठ्या पाण्याचा प्रवाह मध्ये पोहत जाऊन पाणी पुरवठा सुरू केला. पावसाच्या सरी थांबत नव्हत्या तरीसुद्धा यांनी कशाची परवा न करता पाणीपुरवठा सुरळीत केला. नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह अतिशय वेगाने आहे. ही कौतुकास्पद बाब असून गावामध्ये चर्चाचा विषय ठरलेला आहे. गावात यांचे कौतुक होत आहे. सर्व गावकऱ्यांनी यांचे आभार मानले.



# बंद आणि अवसायनात निघालेल्या संस्थांच्या मुद्दलाची संपूर्ण थकबाकी तर; चालू उपसा सिंचन संस्थांच्या मुद्दल थकबाकीची निम्मी रक्कम शासन भरणार : उपमुख्यमंत्री

## राज्य मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणून मंजुरी घेण्याचे अजित पवार यांचे निर्देश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जावरील व्याजाच्या थकबाकीची संपूर्ण रक्कम संबंधित जिल्हा आणि राष्ट्रीयकृत बँकांनी माफ केल्यानंतर थकीत मुद्दलाची रक्कम राज्य शासनातर्फे अदा करण्यात येईल. बंद पडलेल्या आणि अवसायनात निघालेल्या संस्थांच्या मुद्दलाची संपूर्ण थकबाकी तर कार्यरत असलेल्या संस्थांची निम्मी थकबाकी राज्य शासन भरणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणून त्यास मंजुरी घेण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत आज घेण्यात आला. राज्यातील २४५ संस्थांच्या ४० हजार २४५ सभासदांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या निर्णयाचा लाभ होणार असून शेतकऱ्यांना नव्याने पिककर्ज मिळवण्याचा मार्गही खुला होणार आहे.



सांगली जिल्ह्यातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांचे थकीत कर्ज माफ करण्याच्या स्थानिक आमदार मानसिंगराव नाईक यांच्या मागणीसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार मानसिंगराव नाईक, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सहकार आयुक्त दिपक तावरे हे पुण्याहून तर सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापकीय संचालक शिवाजीराव वाघ हे सांगलीहून व्हीसीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्याच्या शेतीविकासात सहकारी उपसा जलसिंचन योजनांची महत्त्वाची भूमिका असून शासनाने वेळोवेळी या संस्थांना मदत केली आहे. राज्यातील २४५ संस्थांचे ४० हजार २४५ सभासद या योजनांचे लाभार्थी आहेत. काळाच्या ओघात काही सहकारी उपसा जलसिंचन संस्था बंद पडल्या. काही अवसायानात निघाल्या तरी अनेक संस्था शेतकऱ्यांच्या जीवनात आजही सकारात्मक बदल घडवत आहेत. बंद पडलेल्या, अवसायानात निघालेल्या आणि चालू स्थितीत असलेल्या सहकारी उपसा सिंचन संस्थांकडे असलेल्या बँकांच्या थकबाकीचा प्रश्न सोडविण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जावरील व्याजाच्या थकबाकीची रक्कम संबंधित जिल्हा आणि राष्ट्रीयकृत बँकांनी माफ करण्याची तयारी दर्शवली आहे. त्यांनी संपूर्ण व्याजाची थकबाकी माफ केल्यास, उर्वरीत थकीत मुद्दलाची रक्कम राज्य शासनातर्फे अदा करण्यात यावी. बंद पडलेल्या आणि अवसायनात निघालेल्या संस्थांच्या मुद्दलाची संपूर्ण थकबाकी तर कार्यरत असलेल्या संस्थांची निम्मी थकबाकी राज्य शासन भरेल. यासंदर्भातील प्रस्ताव सहकार विभागामार्फत मंत्रिमंडळासमोर आणून त्यास मंजूरी घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बैठकीत दिले. या निर्णयाचा लाभ बँकांच्या कर्जाची थकबाकी असलेल्या राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांना आणि त्यांच्या सभासदांना होणार आहे.

# खासदार प्रणिती शिंदे यांचा आरक्षण मागणीचा आवाज दिल्ली दरबारीं

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/विजय घनघाव:सोलापूर च्या खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्ली दरबारीं म्हणजेच संसदेत मराठा समाज व धनगर समाज आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला आहे. सोलापूर चा दुष्काळ संपला, १० वर्षात पहिल्यांदाच सोलापुरच्या खासदारांचा आवाज संसदेत गरजलाअसंच आता म्हणावं लागेल. आज दि. २४ जुलै रोजी सोलापूर खासदार प्रणिती शिंदे यांनी संसद अधिवेशनात मराठा समाज धनगर समाज आरक्षणाचा आवाज उठविला, यावेळी बोलताना म्हणाले की , भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गाला आरक्षण मिळवून दिले. पण केंद्र सरकार खाजगीकरण करून आरक्षण संपवित आहे. त्यामुळे आरक्षण मिळावे यासाठी मराठा समाज, धनगर समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे.



मराठा समाजाचे नेते मनोज जरंगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे. त्यामुळे तणाव वाढत आहे. केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे म्हणून लवकरात लवकर मराठा समाज व धनगर समाजाला आरक्षण द्यावे. त्याच प्रमाणे महिला आरक्षणाची लागू करावे अशी मागणी संसदेच्या शून्य प्रहार वेळी केली आहे.तसेच विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांनी जतनिहाय गणना करण्याची मागणी केली आहे. ती ही करावी.खासदार प्रणिती शिंदे यांच्या भूमिकेचे सोलापूरमध्ये कौतुक होताना दिसत आहे..

# जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांसाठी ऋशांता नारायण'चे सामाजिक भान!

## गरजू, गुणवंत विद्यार्थांसाठीऋएज्युकिट प्रोग्रॅम'

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : ऋशांता नारायण एज्युकेशन आणि चॅरिटेबल ट्रस्ट'ने सामाजिक भान राखत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याचा उपक्रम राबविला. रायगड जिल्हा परिषदेच्या खालापूर तालुक्यातील विविध शाळेत एज्युकिट प्रोग्रॅममधून शैक्षणिक साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर अवर्णनीय आनंद पाहावयास मिळाला.




गेल्या काही वर्षांपासून समाजातील विविध घटकांसाठी ऋशांता नारायण एज्युकेशन आणि चॅरिटेबल ट्रस्ट'कडून विविध उपक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील गरजू, आदिवासी आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना दप्तर, कंपॉस, क्रेऑन, वह्यांसह शैक्षणिक साहित्य मिळावे, या हेतूने यंदाही ट्रस्टतर्फे प्रत्येक शाळेत जात विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधून साहित्य सोपविण्यात आले. तसेच या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी ट्रस्ट पाठिशी उभा राहणार असल्याची ग्वाही दिली.

जिल्हा परिषदेच्या नानिवली, वंजारवाडी, भिवपुरी, वैजनाथ, कर्जत, खोपोली आदी ठिकाणी असलेल्या शाळेत उत्साहात कार्यक्रम पार पडला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ऋशांता नारायण एज्युकेशन ट्रस्ट'च्या सहसचिव कांचन शिंदे, प्रकल्प समन्वयक शशांक सोनावणे, जीवन पोटफोडे, गुंज स्वयंसेवी संस्थेचे आनंद खरे आदींसह शिक्षक, पालकांचीही उपस्थिती होती. या उपक्रमाला शिवस्वराज्य बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अक्षय जाधव, अश्रि्वनी हिवाळे आणि भवांजी कांबळे यांनीही उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

**समाजातील प्रत्येक गरजू घटकांच्या प्रगतीसाठी शांता नारायण एज्युकेशन आणि चॅरिटेबल ट्रस्ट प्रयत्न करीत आहे. शैक्षणिक जाणीवेनुसार शालेय साहित्याचे खालापूरमधील विद्यार्थअयांना वाटप करण्यात आले. यापुढील काळातही या विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहणार आहोत.**

**- कांचन शिंदे, सहसचिव, शांता नारायण एज्युकेशन आणि चॅरिटेबल ट्रस्ट**

# सविता ताई क्रेडिट सोसायटी व तीर्थ दूध शेतकऱ्या ंवरदापण दिनानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: तीर्थ कृषी उद्योग समूह तीर्थ नगर वाडीकुरोली यांच्या वतीने सविताताई क्रेडिट सोसायटीच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त व तीर्थ दूध शेतकऱ्यांन केंद्राच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेश उपाध्यक्ष श्री समाधान काळे व श्री डॉक्टर नीरज शहा सर (एमडी बालरोगतज्ञ) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये ११० रक्तदात्यांनी रक्तदान केले करून सामाजिक उपक्रमात आपले योगदान दिले सदर कार्यक्रमास रणजीत सिंह शिंदे यांनी भेट देऊन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या रखनां शिबिराच्या निमित्ताने डॉक्टर सुधीर शिनगरे डॉक्टर अनिल काळे डॉक्टर राजाभाऊ देटे डॉक्टर कमल किशोर काळे डॉक्टर रणजीत काळे डॉक्टर स्वप्नाली दुपडे सरडे डॉक्टर मयुरी दुपडे डॉक्टर हर्षद सोनवणे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांच्या येथे सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाची संयोजक भीमराव पाचले तसेच संजय



काळे राहुल काळे सोमनाथ काळे महेश काळे धनंजय काळे सिद्धनाथ फासले व सविताबाई क्रेडिट सोसायटीचे सर्व संचालक यांनी विशेष प्रयत्न केले कार्यक्रमाची प्रास्ताविक राहुल काळे बँक शाखा व्यवस्थापक सूत्रसंचालन अक्षय खर्जे व आभार प्रदर्शन डॉक्टर मयूर दुपडे यांनी केले कार्यक्रमास दोन्ही संस्थेची सभासद कर्मचारी अधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सभासद ही उपस्थित होते